


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २६५ •बुधवार,दि.२४ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# पुण्यात दोन राष्ट्रवादी एकत्र, पवार काका-पुतण्याची हातमिळवणी; संजय राऊतांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई । प्रतिनिधी**

नगरपालिका निवडणुकानंतर आता महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. मुंबईत ठाकरेंच्या शिवसेना आणि मनसे पक्षाची युती होणार असून उद्याच जागावाटपही जाहीर होत असल्याने आता महापालिका निवडणुकांसाठीच्या घडामोडींना वेग आला आहे. दुसरीकडे पुण्यातही पवारांकडून रणनीती आखली जात असून दोन राष्ट्रवादी एकत्र येणार आहेत. त्याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी आणि महायुतीत वेगळीच राजकीय समीकरणे पाहायला मिळतील. त्याच पार्श्वभूमीवर दोन राष्ट्रवादी एकत्र ▶ उर्वरित पान २ वर




## तर शरद पवारही उद्या पत्रकार परिषदेला येतील

मुंबईत ठाकरेंसोबत काँग्रेस येणार का या चर्चेला जवळपास पूर्णविराम लागला आहे. मात्र, मुंबई सोडून इतर काही ठिकाणी काँग्रेस सोबती असेल, तशी चर्चा आमची सुरू आहे, असेही राऊत यांनी सांगितले. तर, मुंबईसाठी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत चर्चा सुरू आहे. जर ही चर्चा पूर्ण झाली तर शरद पवार यांना सुद्धा उद्या पत्रकार परिषदेसाठी निमंत्रण दिलं जाईल, ते सध्या पुण्यात आहेत. शरद पवार जर पत्रकार परिषदेला उपस्थित राहिले तर आम्हाला आवडेल, असेही राऊत यांनी म्हटले.

## मुंबईत ठाकरे बंधूंना आव्हान

दोन्ही ठाकरे बंधू एकत्र जरी आले असले तरी ते महाविकास आघाडीमधून लढतील की नाही याची मात्र अद्याप स्पष्टता नाही. काँग्रेसने या आधीच एकटे लढण्याची घोषणा केली असल्याने दलित आणि मुस्लिम मतांची बेगमी करण्याचं मोठं आव्हान ठाकरे बंधूंसमोर असणार आहे. तसेच मराठी बहुल परिसरातील सर्व मराठी मतं कशी पारड्यात टाकता येतील यासाठीही रणनीती आखावी लागणार आहे. उत्तर भारतीय मतदार हा भाजपच्या पाठीशी असेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मराठी मतदार हा आपल्याकडे कसा वळला जाईल यासाठी ठाकरे बंधूंना प्रयत्न करावे लागणार आहेत.

### मनपा निवडणुकीच्या तोंडावर शहरप्रमुखांचा 'जय महाराष्ट्र'

# राजू वैद्य उबाठा सोडून भाजपमध्ये जाणार ?

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु होण्याच्या आधीच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे महानगर प्रमुख रेणुकादास (राजू) वैद्य यांनी पक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा सुरू आहे. येत्या एक-दोन दिवसांत त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होईल असे मानले जात आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मोठी गळती लागली आहे. आतापर्यंत आठ माजी महापौरांनी पक्षाला जय महाराष्ट्र करीत पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला. बारा ते पंधरा माजी नगरसेवकांनी देखील पक्ष त्याग करीत शिवसेनेत प्रवेश केला. पदाधिकारी - कार्यकर्ते देखील शिवसेनेत प्रवेश करीत आहेत. या सर्व घटना घडामोडी घडत असतानाच सोमवारी (२२ डिसेंबर) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख रेणुकादास (राजू) वैद्य यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नावे पत्र पाठवून आपण पदाचा राजीनामा देत आहोत असे कळवले आहे. राजीनामा देण्यामागे वैयक्तिक कारण असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

## कोण आहेत राजू वैद्य ?

-रेणुकादास वैद्य भारतीय विद्यार्थी सेनेच्या छत्रपती संभाजीनगरमधील प्रमुख शिलेदारांपैकी एक
-त्यांना शिवसेनेने महापालिका निवडणुकीत उतरवले. पहिल्याच निवडणुकीत ते क्रांती चौक वॉर्डातून निवडून आले. -त्यानंतर ते पुन्हा याच वॉर्डातून नगरसेवक म्हणून निवडून आले. नगरसेवक म्हणून त्यांनी तिसऱ्यांदा विद्यानगर वॉर्डाचे प्रतिनिधित्व केले.
-महापालिकेत त्यांनी दोन वेळा सभागृह नेता म्हणून आणि स्थायी समितीचे सभापती म्हणून काम केले आहे.
-विधानसभा निवडणुकीवेळी प्रभारी जिल्हाप्रमुख म्हणून त्यांना जबाबदारी देण्यात आली होती.



**स्थानिक नेत्यांच्या गटबाजीमुळे कुचंबणा होत होती त्यामुळे मी राजीनामा दिला. राजीनामा देण्याच्या निर्णयाचे कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे. कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन पुढील निर्णय मी घेणार आहे. - रेणुकादास तथा राजू वैद्य, शहरप्रमुख, शिवसेना उबाठा**

# भाड्याची कार आणून विक्री करणाऱ्या अंतरराज्य टोळीचा बीडमध्ये पर्दाफाश

**● हायटेक रॅकेटचा बीड पोलिसांनी केला गेम, दोघे जेरबंद**

**बीड । प्रतिनिधी**

ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून कार भाड्याने घ्यायची आणि तिची बनावट कागदपत्रांच्या आधारे परस्पर विक्री करायची, इतकेच नाही तर विक्री केलेली कार पुन्हा चोरून न्यायची... अशा एका अतिशय चतूर आणि हायटेक आंतरराज्य टोळीचा पेठ बीड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हैद्राबाद ते नांदल असा धागादोरा शोधत पोलिसांनी दोन अट्टल गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या असून, या कारवाईमुळे वाहन खरेदी-विक्री करणाऱ्या क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.



या प्रकरणाची सुरुवात पेठ बीड येथील रहिवासी तोफीक खाजा बागवान (वय ३३) यांच्या तक्रारीवरून झाली. तोफीक यांनी एक महींद्रा कंपनीची 'दणत ७००' (क्रमांक ७५ २६क५५६) ही कार विकत घेतली होती. मात्र, २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ज्यांनी ही कार विकली होती, त्यांनीच त्यांच्याकडील दुसऱ्या चावीचा वापर करून ही कार पळवून नेली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तोफीक यांनी पेठ बीड पोलीस ठाण्यात धाव घेतली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करत तांत्रिक तपासाचे चक्र फिरवले. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण केले. तपासाचे धागेदोरे थेट नांदेडपर्यंत पोहोचले. पोलिसांनी नांदेडमध्ये सापळा रचून इंद्रजितसिंग बलजितसिंग बावरी (वय २२, रा. जुना कवठा, नांदेड) याला १७ डिसेंबर रोजी ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, ▶ उर्वरित पान २ वर

# नियोजित लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल नको

**● जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातून प्रस्तावित असलेल्या लातूर-अंबेजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या लातूर-कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात बदल करून बीड जिल्ह्याला डावलण्याचा प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आज मंगळवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. परिवहनमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी सदर द्रुतगती मार्ग लातूर-कळंब-पारा-ईट- ▶ उर्वरित पान २ वर



# अखेर विहिरीत मृतदेह आढळून आला!

## ईट येथील नेट ची तयारी करणाऱ्या प्रतीक्षा विनायक पवार विहिरीत जिव देऊन आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

ईट येथील नेट ची तयारी करणाऱ्या प्रतीक्षा विनायक पवार (वय १९ वर्ष ) हिने विहिरीत उडी घेऊन मृतदेह आढळून आला. अभ्यासाचा ताण घेत तिला योग्य मार्ग दर्शन न मिळाल्याने व आई वडील हे गरीब असल्याने तिचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कारखान्याची उचल घेतली शिक्षण पूर्ण करणार होते मात्र ती गरिबीला त्रस्त झाल्याने तिने मौजे ईट येथील गुगळा देवी तांडा येथे विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याचे मंगळवार दिनांक २४ डिसेंबर रोजी उघड झाले. कुमारी प्रतीक्षा विनायक ▶ उर्वरित पान २ वर



# डॉ.ज्योती घुंबरे यांच्याकडून भाजपच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

## निवडणूक लढविण्याची संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांचे मानले आभार

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाकडून विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांच्या निवासस्थानी मंगळवारी (दि.२३) सत्कार करण्यात आला. नवनिर्वाचित नगरसेविका डॉ. सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक मंगेश धोंगडे ▶ उर्वरित पान २ वर



## बीडच्या विकासासाठी भाजपचे नगरसेवक सक्षमपणे काम करतील : डॉ.ज्योती घुंबरे

माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या प्रत्येक मतदाराचे, कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकाचे मी मनापासून आभार मानते. निकाल काहीही असला, तरी या निवडणुकीतून भाजपची ताकद दिसून आली. शहरातून भारतीय जनता पक्षाचे १५ नगरसेवक निवडून आले असून, शहराच्या विकासासाठी भाजप सक्षमपणे काम करेल, याची मला पूर्ण खात्री आहे, असेही डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या.

# संतोष देशमुख हत्या प्रकरण: मुख्य आरोपी वाल्मिक कराडने नाकारले आरोप, न्यायालयात दोषारोप निश्चिती




## मुख्य आरोपी वाल्मिक कराडने नाकारले आरोप, न्यायालयात दोषारोप निश्चिती

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणाने आज न्यायालयात महत्त्वाचे वळण घेतले. बीड येथील जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात झालेल्या २३ व्या सुनावणीत मुख्य आरोपी वाल्मिक कराडसह सर्व आरोपींवर दोषारोप निश्चित करण्यात आले आहेत. न्यायाधीशांनी विचारलेल्या प्रश्नावर वाल्मिक कराडने प्रथमच मौन सोडत आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, ९ डिसेंबर २०२४ रोजी केज तालुक्यातील टाकळी शिवारात सरपंच संतोष देशमुख यांची क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. खंडणी वसुलीत अडथळा निर्माण केल्याच्या रागातून आरोपींनी हे कृत्य केल्याचा प्राथमिक निष्कर्ष आहे. या प्रकरणात वाल्मिक कराड, सुदर्शन घुले, जयराम चाटे, श्रीकृष्ण आंधळे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार आणि विष्णू चाटे या आरोपींचा समावेश आहे. ▶ उर्वरित पान २ वर




# वैद्यनाथांच्या दर्शनासाठी पंतप्रधानांच्या पत्नी जशोदाबेन मोदी परळीत

**● घातलं देशासाठी साकडं**

**परळी । प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी आणि पंतप्रधानांचे बंधू अशोक मोदी यांनी आज तीर्थक्षेत्र परळी येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथांच्या मंदिरात दर्शनासाठी भेट दिली. अतिशय साध्या वेशभूषेत आणि भक्तिमय वातावरणात त्यांनी प्रभू वैद्यनाथांची विधीवत पूजा आणि ▶ उर्वरित पान २ वर




## ● देशाच्या कल्याणासाठी साकडं

दर्शनानंतर जशोदाबेन मोदी यांनी प्रभू वैद्यनाथांकडे देशातील सुख-समृद्धी आणि जन-कल्याणासाठी प्रार्थना केली. या प्रसंगी त्यांच्या चेहऱ्यावरील शांतता आणि साधेपणा पाहून मंदिर परिसरात उपस्थित असलेले भाविक भारावून गेले होते. कोणतीही बडेजाव न ठेवता एका सामान्य भाविकाप्रमाणे त्यांनी रांगेत उभे राहून घेतलेले दर्शन परळीत चर्चेचा विषय ठरले.

## ● माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी केलं स्वागत

सुरुवातीला माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी जशोदाबेन मोदी यांचे स्वागत केलं. या भेटीदरम्यान मंदिर प्रशासनाचे पदाधिकारी, स्थानिक भाविक आणि पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर तैनात होता. जशोदाबेन मोदी यांच्या या आध्यात्मिक भेटीमुळे परळी वैजनाथ मंदिर परिसरात दिवसभर उत्साहाचे आणि भक्तीचे वातावरण पाहायला मिळाले.



# राष्ट्रीय ग्राहक दिन : जागरूक ग्राहक हेच सक्षम राष्ट्राचे खरे बळ

## 24 डिसेंबर रोजीच नव्हे ; तर वर्षभर ग्राहकांनी आपले हित बघितले पाहिजे

ग्राहक म्हणजे केवळ बाजारातून वस्तू घेणारा माणूस नव्हे , तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे . ग्राहक खरेदी करतो , सेवा घेतो , कर भरतो आणि त्यामुळे उद्योग , व्यापार , सेवा क्षेत्र व शासन व्यवस्था गतिमान राहते . म्हणूनच ग्राहक सुरक्षित , जागरूक आणि न्याय मिळवू शकणारा असेल , तरच समाज सशक्त आणि राष्ट्र मजबूत राहते . या जाणिवेतून दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो . १९८६ साली भारतात ग्राहक संरक्षण कायदा लागू करण्यात आला आणि या कायद्यामुळे प्रथमच सामान्य ग्राहकाला कायदेशीर संरक्षण मिळाले . त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय ग्राहक दिनाचा उद्देश केवळ कार्यक्रम , भाषणे किंवा घोषणांपुरता मर्यादित नाही , तर ग्राहकाला त्याचे हक्क समजावून सांगणे , अन्याय झाल्यास न्याय कसा मिळवायचा हे शिकवणे आणि बाजारपेठ अधिक पारदर्शक व प्रामाणिक बनवणे हा आहे . ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ग्राहकाला सहा मूलभूत हक्क दिले गेले आहेत . सुरक्षिततेचा हक्क म्हणजे ग्राहकाने घेतलेली




वस्तू किंवा सेवा त्याच्या आरोग्यास , जीवनास किंवा मालमत्तेस धोका निर्माण करणारी नसावी . माहितीचा हक्क म्हणजे वस्तूची किंमत , दर्जा , वजन , घटक , वापराची पद्धत , हमी आणि अटी याची संपूर्ण व स्पष्ट माहिती मिळणे . निवडीचा हक्क म्हणजे ग्राहकावर कोणतीही वस्तू किंवा सेवा जबरदस्तीने लादली जाऊ नये . ऐकून घेण्याचा हक्क म्हणजे ग्राहकाची तक्रार योग्य ठिकाणी ऐकली जावी . तक्रार निवारणाचा हक्क म्हणजे फसवणूक किंवा चुकीच्या सेवेविरुद्ध न्याय मिळणे . ग्राहक शिक्षणाचा हक्क म्हणजे ग्राहकाला स्वतःच्या हक्कांची माहिती मिळणे .

आजच्या काळात बाजारपेठ प्रचंड वेगाने बदलली आहे . ऑनलाईन खरेदी , मोबाईल प्स , डिजिटल पेमेंट , विमा योजना , बँकिंग सेवा , खासगी शिक्षण संस्था , रुग्णालये , मोबाईल नेटवर्क आणि ई–कॉमर्समुळे सुविधा वाढल्या असल्या , तरी फसवणूक , चुकीची जाहिरात , लपवलेल्या अटी , बनावट सवलती , निकृष्ट दर्जा आणि डेटा चोरी यांसारख्या समस्या वाढल्या आहेत . मोबाईल घेतल्यानंतर हमी नाकारणे , ऑनलाईन मागवलेली वस्तू वेगळीच मिळणे , शेतकऱ्यांना बनावट बियाणे किंवा खत देणे, रुग्णालयात अवाजवी बिल आकारणे , विमा कंपनीकडून दावा नाकारणे , बँकेने अनावश्यक शुल्क आकारणे अशा घटना आज सामान्य झाल्या आहेत . अशा वेळी ग्राहकाने गप्प बसणे योग्य नाही , तर कायदेशीर मार्गाने न्याय मागणे गरजेचे आहे .

ग्राहकांना न्याय देण्यासाठी भारतात ग्राहक न्यायालयांची स्वतंत्र व्यवस्था उभारण्यात आली आहे . ही न्यायालये जिल्हा , राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत . बहुतांश सामान्य प्रकरणांसाठी जिल्हा ग्राहक न्यायालयात अर्ज करता येतो . या न्यायालयात जाण्यासाठी वकील अनिवार्य नाही . सामान्य नागरिक स्वतः अर्ज सादर करू शकतो . अर्ज करण्यापूर्वी खरेदीचे बिल , पावती , हमीपत्र , कराराची प्रत , ऑनलाईन ऑर्डरचा पुरावा , तक्रारीचे संदेश किंवा ई–मेल अशी कागदपत्रे जमा करणे आवश्यक असते . अर्जात ग्राहकाचे नाव , पत्ता , समोरच्या व्यक्ती किंवा कंपनीचे नाव , तक्रारीचे स्वरूप , झालेले नुकसान आणि मागणी स्पष्टपणे नमूद करावी लागते .

उदाहरणार्थ, एखाद्या नागरिकाने नवीन मोबाईल खरेदी केला आणि काही दिवसांत तो बंद पडला , तरीही दुकानदाराने बदल देण्यास नकार दिला , तर ग्राहक बिलासह जिल्हा ग्राहक न्यायालयात तक्रार करू शकतो . न्यायालय तपासणी करून मोबाईल बदलण्याचा किंवा नुकसानभरपाई देण्याचा आदेश देऊ शकते . एका शेतकऱ्याने खासगी कंपनीचे बियाणे घेतले , पीक उगवले नाही , तर तो बिल व शेतातील पुरावे सादर करून तक्रार दाखल करू शकतो आणि कंपनीला नुकसानभरपाई द्यावी लागू शकते . यावरून ग्राहक न्यायालय सामान्य माणसासाठी किती प्रभावी आहे हे स्पष्ट होते .

शासनाने ग्राहकांसाठी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन सुरू केली असून टोल फ्री क्रमांक १९१५ तसेच ऑनलाईन तक्रार प्रणाली उपलब्ध आहे . यामुळे गावागावातील ग्राहकही सहजपणे तक्रार नोंदवू शकतात . राष्ट्रीय ग्राहक दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो – ग्राहकाने शांत राहू नये , अन्याय सहन करू नये आणि कायद्याची भीती बाळगू नये . जागरूक ग्राहक असेल तर व्यापारी प्रामाणिक राहतो , सेवा सुधारते आणि बाजारपेठ स्वच्छ राहते .

ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा खरा राजा आहे , पण तो राजा तेव्हाच बनतो जेव्हा तो सजग , माहितीपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण असतो . राष्ट्रीय ग्राहक दिन हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नसून ग्राहकाच्या स्वाभिमानाचा आणि हक्कांचा उत्सव आहे . चुकीला नकार देणे , अन्यायाला विरोध करणे आणि न्यायासाठी उभे राहणे हाच या दिवसाचा खरा अर्थ आहे . जागरूक ग्राहक म्हणजे सक्षम समाज आणि सक्षम समाज म्हणजे मजबूत राष्ट्र – हाच राष्ट्रीय ग्राहक दिनाचा मूलमंत्र आहे .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# केवळ जागरूक आणि सावध ग्राहकच सुरक्षित

आजच्या डिजिटल युगात आर्थिक व्यवहार किंवा खरेदी करणे सोपे झाले आहे, परंतु त्याच वेगाने फसवणूक, बनावट उत्पादने, भेसळ, खोटा देखावा आणि सायबर गुन्हे देखील मर्यादेपलीकडे वाढले आहेत. इतरांवर आंधळेपणाने विश्वास, ढोंग, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि खोट्या आश्वासनांवर विश्वास ठेवण्याऐवजी, आपण स्वतःच्या विवेकबुद्धीचा वापर केला पाहिजे. धोरणे, नियम आणि कायदे पाळा; तरच आपण जागरूक ग्राहक बनू शकू. जर एखाद्या ग्राहकाला एखादी वस्तू किंवा सेवा मिळाली तर ते त्यांनी खर्च केलेल्या किमतीच्या तुलनेयोग्य असली पाहिजे. ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अंतर्गत वस्तूबाबत ग्राहकांचे महत्त्वाचे अधिकार प्रामुख्याने सुरक्षिततेचा अधिकार, माहितीचा अधिकार, निवडीचा अधिकार, सुनावणीचा अधिकार, तक्रारींचे निवारणाचा अधिकार आणि ग्राहक जागरूकता यांचा अधिकार हे विशेषतः सहा आहेत. ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ सोबत अनेक विशिष्ट नियम आणि कायदे आहेत. जसे की ग्राहक संरक्षण (ई-कॉमर्स) नियम, २०२० आणि केंद्रीय आणि राज्य ग्राहक वाद निवारण आयोगांना नियंत्रित करणारे कायदे. हे वेगवेगळे कायदे एकत्रितपणे ग्राहकांना अनुचित पद्धती, उत्पादन आणि सेवा दोषांपासून संरक्षण देतात. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण ही कायद्याअंतर्गत ग्राहकांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेली एक वैधानिक संस्था आहे. ग्राहक वाद निवारण आयोग विवादांचे निराकरण करण्यासाठी तीन-स्तरीय रचना प्रदान करतो, जिल्हा स्तरावर - ५० लाख रुपयांपर्यंत, राज्य स्तरावर - ५० लाख रुपयांपासून ते २ कोटी रुपयांपर्यंत आणि राष्ट्रीय आयोग - २ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे वाद.

उत्पादन दायित्व कायदा हे उत्पादनाची संकल्पना आणते, ज्यामुळे उत्पादक, सेवा प्रदाता आणि विक्रेता त्यांच्या सदोष उत्पादनामुळे किंवा खराब सेवेमुळे होणाऱ्या नुकसानासाठी जबाबदार असतात. ग्राहक संरक्षण (थेट विक्री) कायदा, २०२१ हे कायदे फसव्या योजना रोखण्यासाठी थेट विक्री उद्योगाचे नियमन करतात. ग्राहक संरक्षण (मध्यस्थी) नियम, २०२० ग्राहक मध्यस्थी कक्ष तयार करते आणि मध्यस्थीची प्रक्रिया निश्चित करते. ग्राहक संरक्षण (ग्राहक आयोग प्रक्रिया) नियमावली, २०२० मध्ये ग्राहक आयोगाच्या प्रक्रियेची तपशीलवार माहिती दिली आहे. ग्राहक संरक्षण (सामान्य) कायदा, २०२० मध्ये ग्राहक संरक्षणासाठी सामान्य तरतुदी देण्यात आल्या आहेत. केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण (तज्ञ आणि व्यावसायिकांच्या नियुक्तीसाठी प्रक्रिया) नियमावली, २०२१ मध्ये केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणात तज्ञांना समाविष्ट करण्याची प्रक्रिया निश्चित केली आहे. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, १९५४ अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता नियंत्रित करतो. कृषी उत्पादन (ग्रेडिंग आणि मार्किंग) कायदा, १९३७ कृषी उत्पादनांच्या ग्रेडचे प्रमाणिकरण करतो. भारतीय मानक ब्युरो कायदा, १९८६ प्रमाणन मानकांद्वारे उत्पादनाची गुणवत्ता सुनिश्चित करतो. भारतीय करार कायदा, १८७२ अशा करारांचे नियमन करतो, जे करारांतर्गत ग्राहकांच्या हक्कांवर परिणाम करू शकतात. वस्तू विक्री कायदा, १९३० वस्तूंच्या विक्रीचे नियमन करतो. देशातील ग्राहकांच्या फसवणुकीच्या सामान्य प्रकारांमध्ये एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक माहिती, उदाहरणार्थ, बँक खाते किंवा पॅन तपशील वापरणे समाविष्ट आहे. स्कॅमर लोकांकडून ओटीपी, पासवर्ड किंवा कार्ड तपशील यासारखी संवेदनशील माहिती मिळवण्यासाठी ईमेल, एसएमएस किंवा फोन कॉलद्वारे बँका किंवा इतर विश्वसनीय संस्थांची तोतयागिरी करतात. युनिफाइड पेमेंट इंटरफेस आणि क्रेडिट कार्डवर अनधिकृत व्यवहार खूप सामान्य आहेत. गुंतवणूकदारांच्या पैशांचा वापर करून खऱ्या नफ्याऐवजी उच्च परताव्याचे आश्वासन देणारे गुंतवणूक घोटाळे, यामध्ये ई-कॉमर्स मार्केटप्लेस आणि ऑनलाइन रिटेलर साइट्सवरील स्कॅम समाविष्ट आहेत. स्कॅमर स्वतःला खरा व्यवसाय असल्याचे भासवतात आणि फोनवरून तुमचे पैसे किंवा वैयक्तिक माहिती घेतात.

भारतात सायबर हल्ले सातत्याने वाढत आहेत. राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर नोंदवलेल्या सायबर सुरक्षा घटनांची संख्या २०२२ मध्ये १०.२९ लाखांवरून २०२४ मध्ये २२.६८ लाख झाली आहे, जी १२० टक्क्यांहून अधिक वाढ आहे. देशात "डिजिटल अटक" मध्येही वाढ झाली आहे, जिथे फसवणूक करणारे मोठ्या प्रमाणात विशेषतः वृद्धांकडून पैसे लुटण्यासाठी डीपफेक आणि बनावट ओळखीसारख्या प्रगत पद्धतींचा वापर करत आहेत. ह्या गुन्ह्यांवर प्रतिसाद म्हणून, सर्वोच्च न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे आणि संपूर्ण भारतात या प्रकरणांची चौकशी करण्याचे अधिकार सीबीआयला दिले आहेत आणि ऑनलाइन मध्यस्थांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गेल्या आठ महिन्यांत, महाराष्ट्र राज्यात २१८ डिजिटल अटक प्रकरणांमध्ये निष्पाप लोकांना ११२ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात, डुप्लिकेट उत्पादनांचे मूल्य सुमारे ८ लाख कोटी रुपये होते, त्यापैकी निम्म्याहून अधिक कापड आणि वस्त्र होते, जे ४,०३,९१५ कोटी रुपये होते. २०२४ मध्ये भारतातील बनावटी-विरोधी पॅकेजिंग बाजारपेठेचे मूल्य ₹५.५ अब्ज होते आणि २०२५-२०३३ दरम्यान ते ₹१४.३ अब्ज पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. या वर्षी जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या कालावधीत, ई-कॉमर्स क्षेत्रातील बनावट, खोटे आणि डुप्लिकेट उत्पादनांच्या विक्रीशी संबंधित ७,२२१ तक्रारी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइनवर नोंदवण्यात आल्या. २०२४ च्या सरकारी आकडेवारी आणि अहवालांवर आधारित अंदाज असे दर्शवतात की बनावट औषधांमुळे होणारे आर्थिक नुकसान सुमारे ७.५ अब्ज रुपये आहे. असा अंदाज आहे की भारतात पुरवल्या जाणाऱ्या सर्व औषधांपैकी १२-२५ टक्के औषध बनावट असू शकतात. ग्राहकांची फसवणूक झाल्यास त्वरित मदत मिळवा किंवा तक्रार दाखल करा. नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल (https://cybercrime.gov.in/) वर ऑनलाइन फसवणुकीची तक्रार करा. सामान्य ग्राहक त्यांच्या तक्रारींसाठी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन वेबसाइट (https://consumerhelpline.gov.in/public/) वर त्वरित नोंद करू शकतात किंवा टोल-फ्री क्रमांक १८००-११-४००० किंवा १९१५ वर कॉल करून किंवा ८८०००१९१५ वर एसएमएस करून संपर्क साधू शकतात. ग्राहक डिजिटल पद्धतीने तक्रारी नोंदवण्यासाठी ग्राहक ॲप किंवा राष्ट्रीय पोर्टल ऑफ इंडियाचा वापर देखील करू शकतात.
बँक फसवणूक झाल्यास, बँकिंग लोकपालाकडे तक्रार दाखल करा. गंभीर गुन्हेगारी घटनेच्या बाबतीत, जवळच्या पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करा. ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत, दाव्याच्या रकमेनुसार जिल्हा, राज्य किंवा राष्ट्रीय ग्राहक मंचात तक्रार दाखल करता येते. अनेक ग्राहक संस्था आणि स्वयंसेवी संस्था ग्राहकांच्या हितासाठी मार्गदर्शन देखील करतात, काही प्रकरणांमध्ये, दिवाणी न्यायालय देखील मदत मिळविण्याचा पर्याय असू शकते. अनेकदा, वाद सोडवण्यासाठी मध्यस्थीसारख्या पद्धती अस्तित्वात असतात. केवळ ग्राहकांची जबाबदारी आणि जागरूकताच त्यांना फसवणुकीपासून वाचवू शकते. नैतिक ग्राहक बना, निष्पक्ष राहा आणि चुकीचे धोरण वापरू नका. वस्तू आणि सेवा निवडताना, त्यांची गुणवत्ता आणि सुरक्षितता विचारात घ्या, उत्पादन किंवा सेवेबद्दल माहिती गोळा करा आणि सध्याच्या तंत्रज्ञानातील बदल किंवा नवोपक्रमांबद्दल स्वतःला अपडेट ठेवा. ग्राहकांनी स्वतः विचार करावा आणि त्यांच्या गरजेनुसार उत्पादन किंवा सेवा निवडावी. ग्राहकांनी आपली मते मांडावी, वस्तू उत्पादक आणि सरकारसमोर आपल्या गरजा आणि इच्छा व्यक्त करा. एखाद्या उत्पादनाबद्दल किंवा सेवेबद्दल असमाधान असल्यास कळवा आणि इतरांना देखील सांगा. माहितीपूर्ण ग्राहक बना, जागरूक रहा, सुरक्षित रहा. **- डॉ. प्रीतम भी. गेडाम**

◆ पान १ वरून पुढे...

## पुण्यात दोन...

येणार असल्याच्या अनुषंगाने विचारलेल्या प्रश्नावरुन संजय राऊत यांनी अजित पवारांना लक्ष्य केलं. अजित पवारांना युतीत राहण्याचा अधिकार नाही, असे त्यांनी म्हटले. अजित पवार यांचे नेते देवेंद्र फडणवीस, अमित शाह आणि नरेंद्र मोदी आहेत. जर पुण्यात अजित पवार आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र येत असेल तर महायुतीमध्ये अजित पवार यांना राहण्याचा अधिकार नाही, असे शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी म्हटले. तसेच, पुण्यात जर दोन राष्ट्रवादी एकत्र असतील तर आम्ही शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससोबत पुण्यात जाणार नाही. मनसे आणि आम्ही निवडणूक लढवू, काँग्रेससुद्धा आमच्या सोबत पुण्यात येईल, त्यांच्याशी चर्चा सुरु आहे अशी माहितीही संजय राऊत यांनी दिली.

## भाड्याची कार....

या मोठ्या रॅकेटचा उलगडा झाला. त्याच्या माहितीवरून पोलिसांनी मोहमद रव्यान मोहमद एजाज (वय २३, रा. मोगलपुरा, हैद्राबाद) याला तेलंगणातून अटक केली. तपासात धक्कादायक माहिती समोर आली की, हे आरोपी हैद्राबाद येथील 'लॉंग ड्राईव्ह कार्स' या कंपनीकडून ऑनलाईन पद्धतीने कार भाड्याने घेत असत. त्यानंतर त्या कारची परस्पर विक्री केली जायची. मात्र, कारचे भाडे थकल्यानंतर किंवा मुदत संपल्यानंतर संबंधित कंपनीची रिकव्हरी टीम जीपीएस च्या मदतीने कारचा शोध घेत असे आणि त्यांच्याकडील दुसऱ्या चावीने कार पुन्हा घेऊन जात असे. यामुळे खरेदीदाराला आपली कार चोरीला गेल्याचे वाटत असे, तर प्रत्यक्षात तो एका मोठ्या फसवणुकीचा बळी ठरलेला असायचा. पोलिसांनी तपासादरम्यान चोरी गेलेली कार जप्त केली आहे. ही धाडसी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नित्यानंद उबाळे, नितीन राठोड, हनुमंत उगले, कल्याण जाधव आणि आश्वीन सुरवसे यांनी केली आहे. अशा प्रकारे कुणाची फसवणूक झाली असल्यास पेठ बीड पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जुने वाहन खरेदी करताना केवळ विश्वासावर व्यवहार न करता. कागदपत्रांची अधिकृत खात्री करण्याचे आवाहनही पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

## नियोजित लातूर...

खर्डा–जामखेड–अहिल्यानगर–कल्याण या मार्गाने नेण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर केल्याचे समोर आले आहे. हा प्रस्ताव बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासावर अन्याय करणारा असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या महामार्गामुळे बीड जिल्ह्यात उद्योगधंदे, रोजगारनिर्मिती तसेच कृषी व कृषीपूरक व्यवसायाला मोठा चालना मिळणार असून शेतकऱ्यांचे उत्पादन मुंबई–ठाणे महानगर प्रदेशापर्यंत जलदगतीने पोहोचू शकणार आहे. त्यामुळे बाजारपेठेचा विस्तार होऊन शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार असताना बीड जिल्ह्याला वगळण्याचा कोणताही निर्णय अन्यायकारक ठरेल, असे मत आंदोलकांनी व्यक्त केले. पूर्वनियोजित लातूर–कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्गाच्या आराखड्यात कोणताही बदल करू नये, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले. जर नियोजित आराखड्यात बदल करण्यात आला, तर प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणासाठी येणारे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या समोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनात शेख युनूस, सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार,माजी सैनिक अशोक येड (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, कुलदीप करपे, गणेश मस्के,प्रा.ज्ञानेश्वर राऊत, सुहास जायभाये, गणेश नाईकवाडे, राजु गायके, अर्जुन सोनावणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लातूर ते मुंबई हे अंतर सध्याच्या सुमारे १०–१२ तासांवरून ४–५ तासांत पूर्ण करण्याच्या उद्देशाने लातूर–कल्याण (जनकल्याण) द्रुतगती मार्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर करण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार हा मार्ग लातूर–अंबेजोगाई–केज–बीड–जामखेड–अहिल्यानगर–कल्याण असा प्रस्तावित आहे. मात्र, प्रताप सरनाईक यांनी अंतर ६० ते ७० किलोमीटरने कमी होईल, खर्च व वेळेची बचत होईल आणि धाराशिव जिल्ह्यालाही लाभ होईल, असे कारण देत पर्यायी मार्ग सुचविला आहे. परंतु यामुळे बीड जिल्ह्यातील कृषीप्रधान शेतकरी व व्यावसायिकांना होणारा विकासाचा लाभ हिरावला जाणार असल्याने सदर प्रस्तावाला तीव्र विरोध करण्यात येत आहे.

## अखेर विहिरीत....

पवार (वय १९) ही दिनांक १८/१२/२०२५ रात्री १० वाजल्यापासून हरवलेली आहे. असे पिंपळनेर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली होती. मात्र तब्बल पाच दिवसांनी तिचा मृतदेह एका विहिरीत आढळून आल्याने ईट परिसरा मध्ये हळ हळ व्यक्त होत आहे. मंगळवारी दुपारी घटनास्थळी सपोनी मधुसूदन घुगे हे दाखल झाले होते. संपूर्ण चौकशी करून मृत देह पोस्ट मॉर्टन साठी दाखल करण्यात आला होता.असे सपोनी मधुसूदन घुगे यांना दूरध्वनी वरून संपर्क केला असता त्यांनी दैनिक मराठवाड पत्रला कळवले आहे.

## डॉ.ज्योती घुंबरे...

तसेच ॲड.नागेश तांबरे यांचा सन्मान केला. इतरही नगरसेवकांचा सत्कार केला जाणार असल्याचे सांगत डॉ.ज्योती घुंबरे म्हणाल्या, पक्षाने दिलेल्या संधीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढविण्याची संधी दिल्याबद्दल त्यांनी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांचे विशेष आभार मानले. आगामी काळात भाजपचे सर्व नगरसेवक एकत्रितपणे शहराच्या विकासासाठी कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ.रविंद्र घुंबरे, नरेंद्र घुंबरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संतोष देशमुख...

आरोपींनी संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे १५ व्हिडिओ आणि ८ फोटो काढले होते, जे तपासात महत्त्वाचे पुरावे ठरले आहेत. आजच्या सुनावणीदरम्यान विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी न्यायालयात जोरदार युक्तिवाद केला. न्यायालयाने सर्व आरोपींना त्यांच्यावरील गुन्ह्यांचे स्वरूप सविस्तर वाचून दाखवले आणि त्यांना हे आरोप मान्य आहेत का, अशी विचारणा केली. त्यावर वाल्मिक कराडने स्वतःहून पुढे येत हे आरोप मान्य नसल्याचे न्यायालयाला सांगितले. उज्वल निकम यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, आरोपींच्या वकिलांकडून खटला लांबवण्याचा प्रयत्न होत आहे, मात्र न्यायालयीन प्रक्रिया गतिमान करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणाचा तपास केज पोलीस ठाण्यांतर्गत करण्यात आला असून पोलिसांनी १८०० पानांचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ८ जानेवारी रोजी निश्चित करण्यात आली असून, त्या दिवशी प्रत्यक्ष पुराव्यांचे आणि साक्षीदारांचे काम सुरू होण्याची शक्यता आहे.

## वैद्यनाथांच्या दर्शनासाठी....

आरती केली. सोमवारी सकाळी जशोदाबेन मोदी आणि अशोक मोदी यांचे मंदिर परिसरात आगमन झाले. यावेळी मंदिर प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात पुजाऱ्यांनी वैदिक मंत्रोच्चाराच्या जयघोषात पूजा पार पाडली. जशोदाबेन यांनी अत्यंत श्रद्धेने प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घेतले आणि पुष्प अर्पण केले.

◆ पान ४ वरून पुढे...

## अजित दादा बीड...

जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या नेतृत्वाखाली वाटप केली जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. निकृष्ट ज्वारी पाहण्यासाठीही त्यांच्याकडे वेळ नाही का? असा रोष नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या गंभीर प्रकरणी अनेक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदने सादर केली आहेत. निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, बीड जिल्ह्यातील सर्वच स्वस्त धान्य दुकानांमध्ये पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून निकृष्ट दर्जाची ज्वारी वाटप करण्याचा दबाव टाकण्यात येत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ही ज्वारी मानवास तसेच जनावरांसाठीही खाण्यायोग्य नसून, तिच्या खरेदी–विक्री प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. निकृष्ट ज्वारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचीच चौकशी करावी संबंधित विभागाचे प्रमुख असलेले जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी हे या संपूर्ण प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते लल्लीत अब्बड यांनी केला आहे. ही परिस्थिती पाहता यामध्ये थेट भ्रष्टाचार झाला असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शिवकुमार स्वामी यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.


## उद्याच्या 'शेतकरी...

त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. विशेषतः कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांचे दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने गुरुवार दि.२५ डिसेंबर२०२५ रोजी सकाळी ११वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, ते बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य शेतकरी हक्क मोर्चा काढण्यात येणार असल्याचे समितीचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे ,कुलदीप करपे डॉ. गणेश ढवळे ,गणेश मस्के ,सुहास जायभाय,अर्जुन सोनवणे, राजू गायके,अण्णासाहेब राऊत यांनी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत – शेतकऱ्यांच्या कापसाला किमान १२०००/–प्रति क्विंटल भाव देण्यात यावा.सोयाबीनसाठी किमान ७००० प्रति क्विंटल दर निश्चित करण्यात यावा. कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (CCI) कडून होणारी अडवणूक थांबवून सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात यावा. हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल खरेदी करणाऱ्या बाजार समित्या व व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. बाजारात कमी दराने खरेदी झालेल्या शेतमालाचा विक्रीदर व खरेदीदरातील फरक सरकारने अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना भरून द्यावा. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, सबसिडी, ठिबक, तुषार सिंचन अनुदान व पीक विमा यांची थकीत रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. या मागण्यांकडे शासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांमध्ये तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. शेतकरी हक्क मोर्चाला जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शाळा आता मनमानी पद्धतीने 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल' शब्द वापरू शकणार नाहीत

## शासनाचा निर्णय; निर्णयाची अंमलबजावणी करा : मनोज जाधव यांची मागणी



**बीड । प्रतिनिधी**

राज्य शिक्षण मंडळाच्या अखत्यारितील शाळांकडून आपल्या नावांमध्ये 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल', 'सीबीएसई' अशा फॅन्सी शब्दांचा वापर करून पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असल्याचे उघड झाले आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेत शिक्षण संचालनालयाने आता कठोर पाऊल उचलले आहेत. पालक-विद्यार्थ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी अशा शब्दांचा वापर करणाऱ्या शाळांवर बंदी घालण्यात आली असून, त्यांना तात्काळ नावे बदलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याची जिल्ह्यात तात्काळ काटेकोरपणे अंमलबजावणी करून पालकांची दिशाभूल करणाऱ्या शाळांची नावे बदलण्यात यावीत अशी मागणी आज निवेदनाद्वारे शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे. राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या अनेक शाळांनी आपल्या नावांमध्ये 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'सीबीएसई' किंवा 'इंग्लिश मीडियम' यांसारख्या शब्दांचा गैरवापर सुरू केला आहे. या शब्दांमुळे संबंधित शाळा आंतरराष्ट्रीय किंवा केंद्रीय शिक्षण मंडळाशी (उदा. CBSE) संलग्न असल्याचा पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा गैरसमज होत आहे, ज्यामुळे त्यांची दिशाभूल होत आहे. अनेक शाळांकडे कोणतीही आंतरराष्ट्रीय संलग्नता नसतानाही ते असे शब्द वापरत असल्याचे सर्रास पाहावयास मिळत आहे. पालक, विद्यार्थी आणि समाजाची दिशाभूल किंवा फसवणूक करणारे गैर-कायदेशीर शब्द शाळांच्या नावांमध्ये वापरले जाऊ नयेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. 'सीबीएसई' (CBSE) हे केंद्र सरकारने स्थापन केलेल्या परीक्षा मंडळाचे नाव आहे. राज्य मंडळाच्या शाळांनी हे नाव वापरणे कायदेशीरदृष्ट्या अनुचित आहे. तसेच, 'इंटरनॅशनल' किंवा 'ग्लोबल' शब्द वापरण्यासाठी परदेशातील शाखा किंवा अधिकृत आंतरराष्ट्रीय संलग्नता असणे बंधनकारक आहे. तेव्हा बीड जिल्ह्यातील चुकीच्या नावाने सुरू असलेल्या शाळांची नावे तत्काळ बदलण्याची मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

**● हा निर्णय महाराष्ट्र राज्यातील राज्य शिक्षण मंडळाच्या (State Board) अखत्यारितील सर्व शाळांना लागू झाला आहे. विशेषत: ज्या शाळांनी आपल्या नावांमध्ये 'ग्लोबल', 'इंटरनॅशनल', 'सीबीएसई' किंवा 'इंग्लिश मीडियम' यांसारख्या शब्दांचा गैरवापर केला आहे.**

**● हा निर्णय संचालनालयाने घेतला असून, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षक यांना याबाबत कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत**

**● नावांमध्ये दिशाभूल करणारे शब्द आढळल्यास, संबंधित शाळा व्यवस्थापनांना तात्काळ नाव बदलण्यास सांगितले जाणार आहे. नव्याने मान्यता मागणाऱ्या किंवा दर्जावाढीसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या शाळांच्या नावांची काटेकोर तपासणी केली जाईल. पालकांवर प्रतिकूल परिणाम होईल अशी नावे आढळल्यास, ती बदलल्यानंतरच शिफारस केली जाईल**

## पतीचा जाच आणि ननंदेच्या नवऱ्याच्या धमक्या; सासरच्यांच्या दुर्लक्षामुळे विवाहितेने संपवले जीवन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली असून, सासरच्या जाचाला कंटाळून एका विवाहितेने आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना घडली आहे. पतीकडून होणारा शारीरिक आणि मानसिक त्रास, त्यातच ननंदेच्या नवऱ्याकडून मिळणाऱ्या धमक्या आणि या सर्व प्रकाराकडे सासरच्या मंडळींनी केलेले दुर्लक्ष, यामुळे हतबल होऊन विवाहितेने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले आहे. या घटनेने बीड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत विवाहितेचा विवाह काही वर्षांपूर्वी बीडमधील एका तरुणाशी झाला होता. लग्नानंतर काही दिवस सुखाचे गेले, मात्र त्यानंतर पतीने क्षुल्लक कारणांवरून विवाहितेचा छळ करण्यास सुरुवात केली. हा छळ केवळ पतीपुरताच मर्यादित नव्हता. विशेष म्हणजे, या प्रकरणात विवाहितेच्या ननंदेचा नवरा (नंदोई) देखील तिला धमकावत असल्याचे समोर आले आहे. ननंदेचा नवरा वारंवार विवाहितेला दमदाटी करत असे आणि मानसिक त्रास देत असे. विवाहितेने याबद्दल आपल्या सासू-सासऱ्यांना आणि घरातील इतर लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, सासरच्या मंडळींनी तिच्या तक्रारींकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. तुलाच जुळवून घ्यावे लागेल, असे सांगून त्यांनी तिचे म्हणणे ऐकून घेण्यास नकार दिला. एकीकडे पतीचा सततचा जाच आणि दुसरीकडे ननंदेच्या नवऱ्याच्या धमक्या, या दुहेरी कोंडीत विवाहिता सापडली होती. सासरच्यांकडून कोणताही आधार मिळत नसल्याने ती प्रचंड तणावाखाली होती. अखेर या त्रासाला कंटाळून तिने बीडमधील आपल्या राहत्या घरी आत्महत्या करत आपले जीवन संपवले. या दुर्दैवी घटनेनंतर विवाहितेच्या माहेरच्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पती, ननंदेचा नवरा आणि सासरच्या इतर लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून, आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांकडून केली जात आहे.

## २३ वर्षानंतर जमला वर्गमित्रांचा मेळा

**तलवाडा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व जयभवानी माध्यमिक विद्यालयातील २००२ व २००४ साली १० वीत असणार्या विद्यार्थ्यांचा स्नेहमिलनाचा कार्यक्रम त्वरीता माता मंदिरात पार पडला. धकाधकीच्या जीवनात आपल्या कामात अत्यंत व्यस्त असणार्या माणसांना आज मन मोकळा श्वास घेण्यासाठीही ऊसंत मिळत नाही. नोकरी, व्यवसाय, घर सांभाळण्याची कसरत करताना अगदी शेजार्यांनाही न भेटता नुसती धावपळ करणार्या माणसांना मित्रमैत्रीनीत मन मोकळं करण्यासाठी आपले लहानपणीचे मित्र भेटले तर त्यासारखा दुसरा आनंद नाही.लहानपणी सोबत असणार्या मित्र मैत्रिणी आज काय करतात, त्यांच्या आयुष्यात काय चालु आहे हे पहायला कोणाला वेळ नाही पण या विद्यार्थ्यांतील अमर



राऊत, नितीन कुल्थे, रईफोद्दीन शेख (मुन्ना), राहुल धोंगडे, स्मिता खिस्ते, गौतम डोंगरे या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या म्हणजे अगदी २३ वर्षापुर्वीच्या मित्रांना एकत्र आणण्याचे ठरवले.जवळपास १०० जणांचे संपर्क क्रमांक मिळवुन त्यांनी दोन महिन्यात एक व्हॉटस ॲप ग्रुप तयार केला आणि जवळपास सर्वच जुन्या मित्रांना संपर्चात आणले. यानंतर दूसरा टप्पा म्हणजे कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठीही या लोकांनी कबर कसत मंडप, जेवण, जागा, वेळ, ठिकाणाची खात्री करत कार्यक्रम ठरला. आणि तब्बल २३ वर्षानंतर जूने मित्र मैत्रीणी एकत्र आल्या. २१ डिसेंबरला झालेल्या या कार्यक्रमात तत्कालीन शिक्षकांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन गूरु म्हणुन या शिक्षकांना आदर व सन्मानपुर्वक सन्मानचिन्हासह यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर भोजन करुन २३ वर्षानंतर पुन्हा वर्गमित्रांनी वर्ग भरवला.वर्गात बसताना सर्वांनाच पुन्हा ते दिवस आठवल्याने त्या निरागस वयातील बालपण डोळ्यासमोरुन तराळुन गेले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमात २३ वर्षानंतर एकत्र आलेल्या वर्ग मित्रांनी आपले सध्याचे जीवन याबाबत विचार मांडताना एकमेकांना अडीअडचणीत मदत करण्याचा पणही केला.

**●राहुल दुबालेचा किस्सा तर नामदेव कदमचे लहानपणीच्या शैलीत भाषण– लहानपणीचे किस्से सांगताना पोलिस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले यांनी लहानपणीचे किस्से सांगत आठवणींना ऊजाळा दिला तर नामदेव ककदम यांनी लहानपणीच्या शैलीत अभिनयासह भाषण करत सर्वांच्या चेहर्यावर लहानपणीचे हास्य फुलवले.**

## सुशासनाचा विश्वास, थेट संवादाचा धागा: आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहांतर्गत मंडळ स्तरीय आढावा बैठक

### तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा स्तुत्य उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

पाली महसूल मंडळात आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही केवळ प्रशासकीय औपचारिकता न राहता थेट जनतेशी संवाद साधणारी , विश्वास निर्माण करणारी आणि शासन – प्रशासन – जनता या त्रिसूत्रीला बळ देणारी ठरली . ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात शेतकरी , ग्रामस्थ , लोकप्रतिनिधी , महसूल व इतर विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . प्रशासन गावाकडे या संकल्पनेचा प्रत्यय देत समस्या ऐकणे , मार्गदर्शन करणे आणि तात्काळ उपाययोजना सुचवणे हा या बैठकीचा केंद्रबिंदू



ठरला. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार महसूल विभागाचे निर्णय हे केवळ कार्यालयापुरते न राहता थेट गावपातळीवर पोहोचावा , सामान्य नागरिकांच्या समस्या गावातच सोडवाव्यात , हा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे . त्याच अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागभर सुसाशन सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे .

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे सातत्याने या उपक्रमाचा आढावा घेत असून , जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात लोकाभिमुख प्रशासन पोहोचावे , नागरिकांना वेळेत सेवा मिळावी , यासाठी त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही वेळोवेळी बैठका घेऊन , महसूल यंत्रणेला जनतेशी थेट संवाद साधण्याच्या सूचना दिल्या असून , त्याचाच प्रत्यय या मंडळ स्तरीय बैठकीतून आला .या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . त्यांनी औपचारिक भाषणांऐवजी थेट लोकांमध्ये बसून शेतकरी व ग्रामस्थांच्या अडीअडचणी ऐकून घेतल्या . पाणी , शेती , महसूल दाखले , ओळखपत्रे , विविध योजना , अनुदाने , ॲग्रीस्टॅक , पीकविमा , जमीन विषयक प्रश्न यावर त्यांनी शांतपणे आणि मुद्देसूद मार्गदर्शन केले . त्यांच्या या लोकाभिमुख भूमिकेमुळे बैठकीला वेगळीच उंची प्राप्त झाली . या आढावा बैठकीस सरपंच सुशेन खरसाडे ( आहेर वडगाव ) , सरपंच रमेश भोसले ( कोल्हारवाडी ) , उपसरपंच अभिराज रांजवन ( आहेर वडगाव ) , उपसरपंच अशोक सिंघन ( कोल्हारवाडी ) , बाबुराव गोरे ( सदस्य , समनापुर ) हे लोकप्रतिनिधी उपस्थित होते . तसेच पोलीस पाटील सखाराम काटे ( आहेर वडगाव ) , अंगद गोरे ( समनापुर ) , अरुण काटे ( राशन दुकानदार , आहेर वडगाव ) , गिरजाप्पा रोहिटे , मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड ( पाली ) , जितेंद्र शेळके ( आहेर वडगाव ) , राजाभाऊ गायकवाड ( मोची पिंपळगाव ) , राधिका बहिर ( वांगी ) , मीनल खांदे ( कोळवाडी ) , कृषिसहाय्यक सरिता शिंदे , आशा सेविका तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते . सुसाशन सप्ताहाच्या निमित्ताने शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती देण्यात आली . तसेच प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे लाभार्थ्यांना थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा समाधानाचा भाव हा या कार्यक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला.

## क्रांतिजोती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी सौ.अलका शिंदे(राऊत) यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड शहरातील समस्त महिलांच्या वतीने आयोजित क्रांतिजोती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव २०२६ च्या समितीची बैठक श्रीमती ॲडव्होकेट उज्वला भोपळे, श्रीमती साधनाताई भोपळे, श्रीमती आशा गोरे, श्रीमती सविता राऊत, श्रीमती अलका आखाडे, श्रीमती सावित्री नितीन साखरे यांच्या अध्यक्षतेखाली श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सभागृह सावता माळी चौक बीड येथे संपन्न होऊन सर्वानुमते सार्वजनिक जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी श्रीमती अलका शिंदे(राऊत), उपाध्यक्षपदी श्रीमती साधना साहेबराव भोपळे, सचिवपदी श्रीमती डॉ. वैशाली




साळुंके, सहसचिवपदी श्रीमती नंदा साळुंके, कोषाध्यक्षपदी श्रीमती पुजा लांडगे, यांची निवड करण्यात आली. या बैठकीस श्रीमती मंगल काळे, श्रीमती मंदाकिनी राऊत, श्रीमती डॉ वैशाली साळुंखे, श्रीमती जयश्री दुधाळ, श्रीमती छाया लांडगे, श्रीमती चित्रा घाडगे, श्रीमती नंदाताई साळुंके, श्रीमती प्रियंका जाधव (गोरे), श्रीमती वर्षा राऊत(लांडगे), श्रीमती डॉ. राजश्री चौधरी,श्रीमती ज्योती गायकवाड, श्रीमती जयश्री शिंदे, श्रीमती कल्याणी शिंदे, श्रीमती सुरेखा भराटे, श्रीमती मैना राऊत, कु. अन्विता चौधरी, बेबीताई दुधाळ, श्रीमती उल्का शिंदे, श्रीमती गायबाई राऊत, श्रीमती स्वप्ना काळे, श्रीमती राजेश्री गवळी, श्रीमती रोहिणी घाडगे, श्रीमती पार्वती थोरात, श्रीमती कांचन थोरात, श्रीमती अश्विनी इंगळे, श्रीमती ज्योती काळे यांच्यासह बीड शहरातील समस्त सावित्रीच्या लेकी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जयंती समितीच्या वतीने श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सावता माळी चौक बीड येथे दिनांक २८.१२.२०२५ रोजी सकाळी १० वाजता.

## प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी जागरूकता सत्र संपन्न

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव श्वान संघर्ष टाळण्यासाठी जागरूकता सत्र आयोजित करण्यात आलेले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून आयक्यूएसी समन्वयक डॉ. सलीम मुकबुल हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभाग प्रमुख प्रा. मुजावर एस.टी. हे होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक नोडल ऑफिसर डॉ. आरदवाड आर. पी. यांनी केले या प्रस्ताविकेत विद्यार्थ्यांना भटक्या जनावरांबद्दल जागरूक राहण्यासाठी सांगितले यामुळे होणाऱ्या प्रादुर्भावापासून बचाव केला पाहिजे यासाठी आपण जागरूक राहिले पाहिजे.

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती आर. एम. सातव, तदर्थ जिल्हा न्यायाधीश – ३, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. :– ४०४/२०२५**

अर्जदार– १. रईसखाँ खमरखॉ पठाण, वय: ४० वर्षे,
२. खमरखाँ हसनखॉ पठाण, वय ६६ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघे रा. तलवाडा, ता. गेवराई, जि. बीड

:: विरूध्द ::

गैरअर्जदार :– महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

मागणी– अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार क १ यांचा अज्ञान मुलगा नामे १. अश्फाकखा रईसखॉ पठाण, मौजे तलवाडा ता गेवराई जि बीड येथील गट क ६७ मधील ०१हे २० आर असुन सदरील जमीन/ मिळकतीत अज्ञानाचा असणारा १/३ हिस्सा जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वत: किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख : १२/०१/२०२६.

अर्जदारातर्फे वकिल :– ॲड. के व्ही दाभाडे

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक, जिल्हा न्यायालय, बीड

शिक्का

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. १८२८ / २०२५**
**शैलजा भ्र. रामचंद्र चोपडे व इतर वि. निरंक**

अर्जदार– १. शैलजा भ्र. रामचंद्र चोपडे, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्नेहांकित निवास, अंबिका नगर पालवण रोड, खोलवाट बीड, ता.जि.बीड, २. प्रतीक्षा पि. पुरुषोतम अंदुरकर, वय– ४१ वर्षे, धंदा–नौकरी, रा. पिताजी विवेक अपार्टमेंट अ–६, बार्शी रोड, गोल्डन चॉइस हॉटेलच्या बाजूस, भगवानबाबा प्रतिष्ठान जवळ, बार्शी रोड, बीड ता.जि.बीड, ३. रिया पि. राहुल चोपडे, वय – १५ वर्षे, धंदा – शिक्षण, रा. सदर अ. पा. क. आई अर्जदार क्र. २ प्रतीक्षा पि. पुरुषोतम अंदुरकर (प्रतिक्षा भ्र. राहुल चोपडे) वय ४१ वर्षे, धंदा–नौकरी, रा. सदर

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

प्रकरण :– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत राहुल पि. रामचंद्र चोपडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत राहुल पि. रामचंद्र चोपडे हे दिनांक ०९/०६/२०२१ रोजी अल्पशा आजराने लोटस मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल, बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची आई असून अर्जदार क. २ ही मयताची पत्नी असून ती नौकरी असलेने तिथे माहेरकडील नाव प्रतीक्षा पि. पुरुषोतम अंदुरकर तर तिचे पती कडील नाव प्रतीक्षा भ्र राहुल चोपडे असून अर्जदार क्र. ३ ही मयताची मुलगी असून तिची पालनकर्ती अर्जदार क्र. २ आई आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत नामे राहुल पि. रामचंद्र चोपडे रा. अंबिका नगर, पालवण रोड, बीड ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख १५/०१/२०२६.

आज दिनांक १९/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले,
(ॲड. सुरेश एस. साळवे यांच्यामार्फत)

शिक्का

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन अॅन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 26/11/2025

अर्जदार : श्री. सिद्धराज अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव ता.माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) क्र. 30/2025 1. लक्ष्मीबाई नारायण व्यवहारे 2. मारोती नारायण व्यवहारे 3. नंदकुमार सुभाषराव मोव्हटे सर्व रा. हट्टा ता. वसमत जि. हिंगोली
2) लवाद अर्ज क्र. 31/2025 1. सो. कल्पना यशवंत मोरे 2. यशवंत देवराव मोरे 3. राजेश देवराव मोरे रा. पिंपळगाव स.मि. ता. जि. परभणी
3) लवाद अर्ज क्र. 32/2025 1. साबळे केशव किशनराव 2. मीरा केशव साबळे 3. सुरेश केशव साबळे रा. साबळे भोगाव ता. जि. परभणी
4) क्र. 33/2025 1. रामकिशन गंगाराम तिखे 2. इंदुबाई रामकिशन तिखे 3. मच्छिंद्रनाथ प्रल्हाद पाटील रा. उखळद पो.पिंपरी देशमुख जि. परभणी
5) क्र. 34/2025 1. सदानंद रामराव यादव 2. आशामती रामराव यादव 3. रामराव काशीराम यादव रा. शहापूर पो. आर्वी ता. जि. परभणी
6) लवाद अर्ज क्र. 35/2025 1. रामदास बालासाहेब बाराखुदे 2. मीनाक्षी रामदास बाराखुदे दोघे रा. आंबेटाकळी पो. पोखर्णी ता. जि. परभणी 3. मनोहर गुलाबराव रन्हेर रा. दिग्रस पो. आर्वी ता. जि. परभणी
7) लवाद अर्ज क्र. 36/2025 1. मनिषा कारभारी गिराम 2. कारभारी चंद्रभान गिराम 3. आन्साबाई चंद्रभान गिराम रा. बोरवंड खुर्द ता. जि. परभणी
8) क्र. 37/2025 1. मुंजाजी विठ्ठलराव मुळे 2. संगीता मुंजाजी मुळे 3. पंढरीनाथ रामराव माळेकर सर्व रा. मांगनगाव पो. धार ता. जि. परभणी
9) क्र. 38/2025 1. शेख शिकूर शेख अहमद इनामदार 2. परवीन बेगम शेख शिकुर 3. शेख अहमद शेख शिकुर सर्व रा. ब्रम्हपुरी ता. जि. परभणी
10) लवाद अर्ज क्र. 39/2025 1. सुजाता विश्वंबर पांचाळ रा. कारेगाव रोड, गजानन नगर ता. जि. परभणी 2. सविता सतीष गरूड रा राम नगर, परभणी ता. जि. परभणी 3. उषा मुंजाभाऊ गरूड रा. मस्जिद जवळ, मेन रोड, सावंगी बु. ता. वसमत जि. हिंगोली 4. संगीता नंदू सुरनर रा. कारेगाव रोड, महादेव मंदिर जवळ, गजानन नगर, परभणी ता. जि. परभणी
11) लवाद अर्ज क्र. 40/2025 1. प्रणीता अशोक शिंदे 2. अशोक गणपतराव शिंदे 3. संजय नारायणराव गोरे सर्व रा. उमरी ता. जि. परभणी
12) लवाद अर्ज क्र. 41/2025 1. नरहरी मारोतराव बेले 2. शामल नरहरी बेले दोघे रा. आंबेटाकळी पो. पोखर्णी ता. जि. परभणी 3. युवराज सोपान वैरागर रा. ताडपांगरी ता. जि. परभणी
13) लवाद अर्ज क्र. 42/2025 1. महेश भाऊसाहेब चव्हाण 2. श्रीराम उत्तमराव चव्हाण दोघे रा. ब्रम्हपुरी ता. जि. परभणी 3. स्वप्नील विठ्ठलराव कळनुरीकर रा. शिवराम नगर, परभणी ता. जि. परभणी दुसरा पत्ता : विश्वजीवन कॉलनी, वसमत रोड, परभणी ता. जि. परभणी
14) लवाद अर्ज क्र. 43/2025 1. सुभाष दौलतराव गरूड 2. सुमन सुभाष गरूड 3. केशव माणिकराव गरूड रा. पाथरा पो. पिंगळी ता. जि. परभणी

माजलगाव जि. बीड (प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 26/12/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांन सह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

